नगरसचिव

पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

## पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. १
## एप्रिल २००९

पुणे महानगरपालिकेची **मासिक सर्वसाधारण सभा गुरुवार, दि. १६ एप्रिल २००९ रोजी दुपारी ४–०० (चार) वाजता श्री छत्रपती शिवाजीमहाराज सभागृहात** (मनपा सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

### प्रश्नोत्तरे

मुंबई प्रांतिक म न पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

### स्थायी समितीचे ठराव

**विषय क्र. १**

संदर्भ :– १) स्टेशन हेड क्वार्टर, खडकी यांचेकडील पत्र क्र.२०११/पीएमसी/क्यू२, दि.१८/१२/२००७
२) सिक्युरिटी ऑफीसर सी.ए.एफ.व्ही.डी. खडकी यांचे पत्र क्र. १३०९/अे/५८/आयएसओ, दि.१०/१/२००८.
३) मा. महा. आयुक्त यांचे क्रं.मआ/पथ/६०४, दि. ११/९/२००८ चे पत्र.
४) स्थायी समिती ठराव क्रं. १०३१, दि. १७/९/२००८.

–––

मा. महा. आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

बोपोडी भाऊ पाटील रस्त्यालगत मिलीटरी हद्दीत डी. पी. नुसार रुंदीप्रमाण रेषेवर सिमाभिंत बांधणे हे काम तातडीने करावयाचे असल्याने खालील बाबीस मनपा अधिनियम १९४९ चे कलम ६७/३क अन्वये मा. मुख्य सभेच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

१) बोपोडी भाऊ पाटील रस्त्यालगत संरक्षण खात्याच्या हद्दीत मान्य डी. पी. नकाशानुसार रस्ता रुंदीप्रमाण रेषेवर सिमाभिंत बांधणे, टेहाळणी टॉवर बांधणे व रुंदीकरणाच्या भागातील कच्च्या रस्त्याचे क्रस्ट डेव्हलपमेंट करणे हे काम ठेकेदार १. मे. पिलाणे डावरे कन्स्ट्रक्शन २. मे. निखिल कन्स्ट्रक्शन यांचेकडून ७.५०% जास्त या दराने मा. मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर करुन घेण्यास व त्यांना सदर कामाचे बिल अदा करणेस,

२) बांधकाम कालावधीत डांबर/सिमेंट व स्टील यांचे दरात होणारी वाढ/घट+भाववाढ सुत्रानुसार होणारी संभाव्य वाढ/घट त्यानुसार ठेकेदारास अदा/वसूल करणे या अटीस अधीन राहून मा. मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर त्यांचेबरोबर करार करणेस,

**विषय क्र.२**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/मुले/१३४४, दि.६/२/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. २१०६, दि. १०/२/२००९.

–––

मा. अति. महा. आयुक्त (ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

अंदाजपत्रकातील मान्य तरतूदीमधुन र.रु.१० लाखाचे वर्गीकरण मा.उपआयुक्त (गवनि) पुणे मनपा महात्मा फुले मंडई विभाग अर्थशिर्षक २००८–०९ RE ११ T १०१ A १.मुख्य देखरेख वसुली वगैरे ध–निवडणूक खर्च १.निवडणूक व तदनुषंगिक खर्च, निवडणूक कार्यालय खर्च या खात्यातून मा.उपआयुक्त (गवनि) महात्मा फुले मंडई विभाग १९. भाजी मंड्या क–१ भाजी मंड्या म.फुले मंडई विभागाच्या संगणकीकरणासाठी या खात्याकडे वर्ग करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्रं. ३</u>**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/उआ(भुजि)/१५१९,दि.१७/३/२००९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठ.क्र.२३४२,दि.२४/३/२००९.

–––

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

पुणे बाणेर स.नं.५/२/२ या मिळकतीमधील पुणे मनपाच्या ताब्यात येणा–या १६०२.४७ चौ. मी. क्षेत्राची ॲमिनीटी स्पेस मा.नगर अभियंता ठरवतील त्या दराने दिर्घ मुदतीकरीता परराष्ट्र व्यवहार विभाग मंत्रालयाचे पासपोर्ट कार्यालयाकरीता देणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## विधी समितीचा ठराव

**<u>विषय क्र. ४</u>**

संदर्भ :–

१) आयातकर माफी मिळणेबाबत ईऑन खराडी इन्फा स्ट्रक्चर प्रा.लि.यांना मा. महापालिका आयुक्त यांजकडे अग्रेषित केलेला दि. २ /८ /०६ चा अर्ज.

२) संदर्भ क्र. १ चे अनुषंगाने आयातकर कार्यालयाकडील मा. प्रधान सचिव महाराष्ट्र शासनाकडे अभिप्रायासाठी पाठविलेले जा.क्र.ओ/तप/२५७०, दि. १९/८/०६ चे पत्र.

३) संदर्भ क्र. २ चे अनुषंगाने मा. कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन मा. नगर विकास विभाग मंत्रालय यांचे दि. १८/७/०७ चे प्राप्त झालेले पत्र.

४) महानगरपालिका सभा ठ.क्र. २८, दि. २३/४/०८

५) मा.महा.आयुक्त यांचे क्रं.मआओ/तप /३७७, दि.१०/७/०८ चे पत्र.

६) विधी समिती ठराव क्रं.१९,दि.१३/८/२००८

७) मनपा ठराव क्रं. ३०३, दि.२०/११/२००८.

– – –

मा. महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

भारत सरकारचे विशेष आर्थिक क्षेत्र बाबत सन २००० च्या अंतर्गत आयात – निर्यात १९९७ – २००२ चे धोरण व महाराष्ट्र शासन ठ.क्र.एस.इ.झेड.२००१/(१५२)/ आय एन डी – २ दि. १२/१०/२००१ मधील अनुक्रमांक ६ नुसार विशेष आर्थिक क्षेत्र विकसित करणारे विकसक व विशेष आर्थिक क्षेत्रामधील औद्योगिक संस्था व इतर अस्थापना यांनी विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये आयात केलेल्या मालावर जकात माफी देण्यास मान्यता मिळण्यास व याकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४५४, ४५५ अन्वये आवश्यक ती कार्यवाही सुरू करणेस मान्यता मिळणेबाबत मा. मुख्यसभेकडे शिफारस आहे.
(टिप :– सदर विषयाचा विचार माहे एप्रिल २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. ४६५, दि.२०/१/२००९ चा झाला आहे.)

## संकिर्ण

**<u>विषय क्र. ५</u>**

म.न.पा. मुख्य सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मान्य करणेबाबतचे मा. दत्तात्रय खाडे यांचे दि. २६/३/२००९ चे पत्र.

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :– ८/४/२००९.

**सुनिल पारखी,**
**उपनगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :– १३/४/२००९

**पुणे महानगरपालिका –सुचना कार्यपत्रिका क्रं. १ (पुरवणी)**

**एप्रिल २००९**

**गुरुवार दि. १६ एप्रिल २००९ या दिवशी दुपारी ४:०० (चार) वाजता भरणाऱ्या महानगरपालिकेच्या सभेपुढे ठेवण्यासाठी खाली निर्देश केलेल्या प्रस्तावाची सूचना (नोटीस) मा. सभासदांकडून आली आहे.**

**:– मा.सभासदांचा प्रस्ताव –:**

**विषय क्रं. ६**

संदर्भ :– **मा. पृथ्वीराज सुतार व मा. अंकुश तिडके यांची सुचना दि. ८/४/२००९.**

---

पुणे महानगरपालिकेच्या इतिहासात सन २००८ – २००९ साली कर आकारणी व कर संकलन विभागाने सर्वात जास्त कर गोळा केला. मागील वर्षापेक्षा या वर्षी रु. १०० कोटी जास्त कर गोळा केला. याबद्दल कर आकारणी व कर संकलन प्रमुख श्री. विलास कानडे व त्यांचे सर्व सहकारी यांचे ही सभा अभिनंदन करत आहे.

**नगरसचिव कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**
**दि. १३/४/२००९**

**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची डॉकेटस मा.नगरसचिव यांचे कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**